EDUINDEX

# PUBLICATION CERTIFICATE

**This publication certificate has been issued to**

श्रीमती. थोरात अनिता भास्कर

**For publication of research paper titled**

मुक्त आणि दूर शिक्षणातील संमंत्रकांची अभियोग्यता चाचणी विकसन प्रक्रियेतील निकषांचा अभ्यास

**Published in** *Drishtikon with ISSN 0975-119X*

**Vol.** *12* **Issue** *7* **Month** *May* **Year** *2020*

**Impact Factor** *5.60*

**The journal is indexed, peer reviewed and listed in UGC Care.**

SK Sharma

**Editor**

**Note:**This eCertificate is valid with published papers and the paper must be available online at the website under the network of EDUindex. For cross check you can contact at editor@eduindex.org

Drishtikon
*(UGC Care Journal)*
ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7, **May**-2020

# मुक्त आणि दूर शिक्षणातील संमंत्रकांची अभियोग्यता चाचणी विकसन प्रक्रियेतील निकषांचा अभ्यास

**श्रीमती. थोरात अनिता भास्कर**
पीएच.डी.संशोधक
mahaleanita2012@gmail.com

**डॉ. थूल सज्जन शंकरराव**
सहयोगी प्राध्यापक
शिक्षणशास्त्र विद्याशाखा मूल्यमापन विभाग,
यशवंतरावचव्हाण महाराष्ट्र विभाग, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र
मुक्त विद्यापीठ,नाशिकमुक्त विद्यापीठ,नाशिक

**सारांश:-** सध्याच्या शिक्षण पद्धती मध्ये विद्यार्थी हा केंद्रस्थानीअसून शिक्षक हा फक्त अध्यापन करणारा राहीलेला नसून तो एक मार्गदर्शक, सल्लागार, समुपदेशक अशा विविध भूमिका कराव्या लागतात. पारंपारिक शिक्षण व्यवस्थेत शिक्षकाला 'अध्यापनाचे' कार्य तर मुक्त आणि दूर शिक्षणामध्ये संमंत्रकाला संमंत्रणाचे कार्य करावे लागते. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठामध्ये एकूण आठ विद्याशाखा आहेत. या सगळ्या विद्याशाखेमध्ये विविध शिक्षणक्रम अभ्यासकेंद्रामार्फत चालवले जातात. या अभ्यासकेंद्रावरील य.च.मं.मु.विद्यापीठाच्या शिक्षणक्रमाच्यासंमंत्रणाचे कार्य करणाऱ्या संमंत्रकाने आवश्यक ती कौशल्येजोपासणे महत्वाचे आहे. संमंत्रकांच्या मनाचा कल या शिक्षण पद्धतीकडे झुकलेला आहे काय? त्याच्यामध्ये एक आदर्श संमंत्रक होण्याची अभियोग्यता कोणती? चांगल्या संमंत्रकाचे आवश्यक गुण त्याच्याकडे आहेत काय?विद्यार्थ्याप्रती त्याला आस्था,आदर व आधार आहे काय?नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती आहे काय? मुक्त आणि दूर शिक्षणाला अधिक प्रगल्भता मिळवून देण्यासाठी तो कोणते प्रयत्न करतो? संमंत्रण करणाऱ्या संमंत्रकांसाठी अभियोग्यता चाचणीचे विकसन करतांना नेमक्या कोणत्या घटकाचे मोजमाप करणे महत्वाचे आहे जाणून?या सर्व प्रश्नांचे उत्तर म्हणून संमंत्रक अभियोग्यता चाचणी विकसनासाठी कोणते निकष असावेत याकरिता आवश्यक घटकांचा शोध घेण्यासाठी संशोधीकेने 20 तज्ञाकडून मतावली भरून घेण्यात आली आणि आलेले निष्कर्ष हे सविस्तर सदर संशोधन पेपर मध्ये मांडण्यात आलेले आहे.

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7, **May**-2020

**महत्वाच्या संकल्पना**:- संमंत्रक, संमंत्रण, अभियोग्यता.

**प्रस्तावना:-** जोव्यक्तीसंपर्कसत्रात विद्यार्थ्यांचे शैक्षणिक तसेच इतर संबंधित अडचणींचे निवारण करतो, त्याला येथे मुक्त शिक्षणात 'संमंत्रक' असे म्हणतात. इंग्रजीतील 'Counsellor'या शब्दाला संमंत्रक हा पर्यायी शब्द आहे. पारंपरिक शिक्षणप्रक्रियेत प्राध्यापक वर्गात जाऊन शिकवतात; तर संमंत्रक संपर्कसत्रात संमंत्रण करतात. शिकविणे व संमंत्रण करणे ह्या दोन वेगवेगळ्या प्रक्रिया आहेत. संमंत्रणामध्ये शिकविणे हा भाग असू शकतो; पण शिकविण्यामध्ये संमंत्रण नसते. मुक्त शिक्षण प्रक्रिया पूर्णपणे विद्यार्थीकेंद्रित असल्यामुळे "मास एज्युकेशन"ऐवजी "मास पर्सन एज्युकेशन" कडे जाऊन विद्यार्थ्यास शिक्षण घेताना येणाऱ्या अडचणी सोडविणे हे संमंत्रकाचे मूलभूत काम आहे. काही आशय शिकविल्याशिवाय एखादी बाब समजत नसेल तर संमंत्रक त्या विद्यार्थ्यांना पारंपारिक शिक्षणाप्रमाणे शिकवितात. इंग्रजीत संमंत्रकांना आणखी दोन समानार्थी शब्द वापरतात. ते म्हणजे ट्युटर आणि मेंटर (Mentor) होय. ट्युटर म्हणजे शिकवणी घेणारा शिक्षक, तर मेंटर म्हणजे सन्मित्र, जो मित्राप्रमाणे सल्ला देतो. मुक्त आणि दूरशिक्षण प्रक्रियेत अध्ययनार्थीच्या समस्या, प्रश्न सोडवण्यासाठी, शैक्षणिक व्यवस्थेमध्ये समाधानकारक प्रगती करण्यासाठी संमंत्रकाची भूमिका महत्वाची असते. अध्ययनार्थीस मानवी आधार देण्यासाठी संमंत्रण प्रक्रिया प्रभावी पद्धतीने पार पाडली जाते. संमंत्रणाचा उद्देशच अध्यायनार्थीस अभ्यासात प्रभुत्व मिळविण्यास सहाय्य करणे आहे. अद्ययावत माहिती देणे, नवीन कौशल्य आत्मसात करण्यासाठी प्रेरणा देणे, विद्यार्थ्याच्या स्वं-अध्ययनाला चालना देणे, तसेच योग्य वेळी मूल्यमापन करून त्यांना प्रत्याभरण व योग्य मार्गदर्शनाचे कार्य संमंत्रक करतो. विद्यार्थ्याच्या शैक्षणिक उणिवा व त्रुटी जाणून घेवून आवश्यकतेनुसार त्याला मदत करण्याचे काम करणारी व्यक्ती म्हणजेच संमंत्रक होय.संमंत्रणात संमंत्रकांना अध्ययनार्थीशी भावनिक व सामाजिक जवळीक साधून त्यांच्यात आत्मीयता निर्माण करावी लागते. स्वतःचा आत्मविश्वास वाढवून विद्यार्थ्यात ही आत्मविश्वास निर्माण करावा लागतो. अध्ययनार्थीच्या शैक्षणिक व वैयक्तिक समस्या सोडवण्यासाठी पुढाकार घ्यावा लागतो (पाईकराव,साळुंके व राजदेरकर,200८).

**समस्या विधान** :- संमंत्रक अभियोग्यता चाचणी विकसन प्रक्रियेतील निकषांचा अभ्यास.

**संशोधनाची गरज व महत्व :-** मुक्त आणि दूर शिक्षणामध्ये कार्य करणारा संमंत्रकाचा संबंध प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरित्या संमंत्रकाच्या संमंत्रणाविषयी असलेल्या आवडी निवडी, संमंत्रकाचे व्यक्तीमत्व, विद्यार्थी

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7, May-2020

सहभाग, विद्यार्थी प्रतिसाद, सहकारी, मित्र, पालक यांच्याशी असणारे संमंत्रकाचे वर्तन, त्याची शिक्षणाप्रती असलेली आवड, सामाजिक बांधिलकी, व्यवसाय निष्ठा, कर्तव्यनिष्ठा,विद्यार्थ्यांना समजून घेण्याची क्षमता, संस्था स्तरावरील कर्तव्य, कुटुंबातील कर्तव्य या घटकांशी येतो. म्हणून या सर्व बाबींचा परिणाम संमंत्रकावर होत असतो. त्याचप्रमाणे संमंत्रक अभियोग्यता चाचणी विकसन करण्यासाठी कोणते निकष असावेत हे शोधणे महत्वाचे आहे. म्हणून संमंत्रकाची अभियोग्यता दर्जात्मक असावी यासाठी प्रस्तुत संशोधन करणे गरजेचे आहे.

**अभ्यासाची उद्दिष्टे:-**

1) संमंत्रक अभियोग्यतेच्या माहितीचा शोध घेणे.
2) संमंत्रक अभियोग्यता चाचणी निकषानुसार घटक तयार करणे.
3) संमंत्रक अभियोग्यता चाचणीच्या निकषांचा पडताळा घेणे.

**गृहीतके:-**

1) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या शिक्षणक्रमाचे संमंत्रण करण्याचीक्षमता संमंत्रकाजवळ असते.
2) संमंत्रकहे तात्विक, मानसशास्त्रीय व समाजशास्त्रीयआधार घेवून संमंत्रणकरीत असतात.
3) संमंत्रकाची भूमिका,कार्य, जबाबदाऱ्या व अभ्यासकेंद्रावरील कार्यपद्धती ही निश्चित असते

**व्याप्ती:-**

1) प्रस्तुत संशोधन अभ्यास नाशिक शहरातील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाशी संबंधित आहे.
2) प्रस्तुत संशोधन हे विद्यापीठातील विद्याशाखेंतर्गत येणाऱ्या संमंत्रकांशी संबंधित आहे.

**मर्यादा:-**

1) प्रस्तुत संशोधन हे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठामधील एकूण विद्याशाखापैकी शिक्षणशास्त्र विद्याशाखेंपुरते मर्यादित आहे.
2) प्रस्तुत संशोधन हे शिक्षणशास्त्र विद्याशाखेंमध्ये संमंत्रण करणाऱ्या संमंत्रकांपुरते मर्यादित आहे.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत संशोधन अभ्यासामध्ये मुक्त विद्यापीठातील एकूण आठ विद्याशाखेंतर्गत येणाऱ्या विविध शिक्षणक्रमासाठी संमंत्रण करणाऱ्या संमंत्रकाची अभियोग्यता नेमकी कशी असावी यासाठी विकसित करण्यात येणाऱ्या अभियोग्यता चाचणीचे निकष ठरवण्यासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात आला.

**जनसंख्या:-**

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7, May-2020

प्रस्तुत संशोधनाचा नमुना निवडतांना यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठामधील एकूण आठ विद्याशाखामधील ज्या प्राध्यापकांना 15 ते 20 वर्षांचा मुक्त विद्यापीठामध्ये संमंत्रणाचा अनुभव आहे. त्याचप्रमाणे मुक्त आणि दूर शिक्षणात स्वयंअध्ययन साहित्य निर्मिती प्रक्रियेत कार्यरत असलेले वरिष्ठ प्राध्यापक, विद्याशाखांचे संचालक असे एकूण 32 प्राध्यापक सदर अभ्यासाची जनसंख्या आहे.

**नमुना:-**

प्रस्तुत संशोधनाचा नमुना निवडतांना मुक्त विद्यापीठामधील एकूण आठ विद्याशाखामधील ज्या प्राध्यापकांना 15 ते 20 वर्षाचा मुक्त विद्यापीठामध्ये संमंत्रणाचा अनुभव आहे असे एकूण 32 प्राध्यापकांचा जनसंख्येमध्ये समावेश करण्यात आला. सदर शोध अभ्यासासाठी एकूण जनसंख्येपैकी20 प्राध्यापकांची लॉटरी पद्धतीचा उपयोग करून नमुना म्हणून निवड करण्यात आली.

**माहिती संकलनाचे साधन:-**

सदर अभ्यासासाठी संशोधकाने स्वयंनिर्मित तज्ज्ञ मतावलीचा वापर केला. या मतावलीद्वारा माहितीचे संकलन करण्यात आले. या मतावलीमध्ये एकूण 20 निकषांचा समावेश करण्यात आला. या मध्ये सहमत आणि असहमत अशा दोन पर्यायापैकी एका पर्यायाची निवड करून त्या पर्यायाबाबत अभिप्राय घेण्यात आला.

**माहिती विश्लेषणाची साधने:-**

प्रस्तुत अभ्यासामध्ये संमंत्रक अभियोग्यता चाचणी विकसन प्रक्रियेतील निकषांची माहिती मतावलीद्वारा दिलेल्या तज्ज्ञ अभिप्रायाचे शेकडेवारी या संख्याशास्त्रीय साधनाचा वापर करून अंतिम विश्लेषण करण्यात आलेले आहे.

**संशोधनाची कार्यवाही:-**

प्रस्तुत संशोधनाचा एक महत्वाचा भाग म्हणजे संमंत्रकाच्या अभियोग्यता क्षेत्राबावत संबंधित माहितीचा याचा शोध घेणे. या करीता संशोधीकेने यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठामध्ये चालू असलेल्या "संमंत्रक प्रशिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रम" या शिक्षणक्रमाची माहिती घेण्यात आली. त्या मंध्ये संमंत्रक म्हणजे काय? संमंत्रकाच्या संमंत्रणाचे स्वरूप कसे असते? मुक्त व दूर शिक्षणामध्ये संमंत्रकाचे नेमके स्थान काय? इत्यादी सर्व प्रश्नाची माहिती जाणून घेतली. तसेच संमंत्रकाच्या अभियोग्यता चाचणी संदर्भात असलेल्या घटकाचा शोध घेण्यासठी विद्यापीठाने प्रकाशित केलेल्या संमंत्रणाविषयक साहित्याचे वाचन केले. त्यातून स्पष्ट होणारी संमंत्रकाची भूमिका,गुणवैशिष्ट लक्षात घेवून एक

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7, May-2020

यादी तयार करण्यात आली. संशोधीकेने एकूण ४५निकषांची एक यादी तयार केली. अश्या पद्धतीने संदर्भ साहित्याच्या मदतीने संमंत्रक अभियोग्यता चाचणीसाठी आवश्यक असणारे घटक निश्चित केले.या ४५ घटकांचे पुन्हा 20 घटकांमध्ये रुपांतर करण्यात आले ते पुढीलप्रमाणे-

**कोष्टक क्र. १ संमंत्रक अभियोग्यता चाचणी (CAT) चे निकषांची यादी**

| अ.क्र | **निकषांची यादी** (List of points) |
|---|---|
| 1 | संमंत्रकाची बुद्धिमत्ता**(Intelligence of Counsellor)** |
| 2 | संमंत्रकाचे सामान्य ज्ञान **(General Knowledge of counsellor)** |
| 3 | मुक्त आणि दूरशिक्षण पद्धती **(Open and Distance Learning System)** |
| 4 | संमंत्रकाद्वारा मूल्यमापन क्षमता **(Evaluation ability of counsellor)** |
| 5 | संमंत्रकाचा तात्विक, समाजशास्त्रीय, मानसशास्त्रीय दृष्टीकोन **(Philosophical, Sociological and Psychological point of view of counsellor)** |
| 6 | संमंत्रकाचा व्यक्तिमत्व विकास **(Personality Development of counsellor)** |
| 7 | संमंत्रकाचे शैक्षणिक सामान्य ज्ञान **(Counsellors Educational General Knowledge)** |
| 8 | विद्यार्थी सहाय्य प्रक्रियेतील सहभाग **(Active participation in Student Support System)** |
| 9 | संमंत्रकाची संमंत्रण (अध्ययन, अध्यापन, मूल्यमापन) प्रक्रिया **(Counsellors Counselling (Learning, Teaching, Evaluation) System)** |
| 10 | संमंत्रकाचे कार्य व जबाबदारी **(Roll and Responsibility of Counsellor)** |
| 11 | संमंत्रकाचे संशोधन ज्ञान व क्षमता **(Counsellors Research Knowledge and Ability)** |
| 12 | संमंत्रक व अध्ययनार्थी याच्यातील आंतर्क्रिया **(Relationship of Counsellor and Student)** |
| 13 | संमंत्रकाचे माहिती तंत्रज्ञान, संप्रेषण व कौशल्य क्षमता **(Counsellors Ability of Information communication, Technology and skill)** |
| 14 | संमंत्रकाचा संमंत्रणाविषयीचा उद्देश **(Counsellors main purpose of counselling)** |
| 15 | संमंत्रकाची भाषिक क्षमता **(Counsellors language ability)** |
| 16 | संमंत्रकाचे आशय ज्ञान **(Counsellors Content Knowledge)** |
| 17 | संमंत्रकाचे शैक्षणिक विस्तार कार्य **(Counsellors Educational Extension Work)** |
| 18 | संमंत्रकाचे सामाजिक विस्तार कार्य **(Counsellors Social Extension Work)** |
| 19 | संमंत्रकाची व्यवसायिक निष्ठा क्षमता **(Counsellors Professional Development)** |
| 20 | संमंत्रकाची आकलन क्षमता **(Counsellors Understanding Ability)** |

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7, May-2020

वरील प्रमाणे संमंत्रक अभियोग्यता चाचणीसाठी आवश्यक निकषांची यादी निश्चित करण्यात आली त्यानंतर या घटकांचे क्रम निश्चित करण्यासठी तज्ञांचे मत घेण्यात आले ते पुढील कोष्टकात दर्शविण्यात आलेले आहे.

**कोष्टक क्र. 2 संमंत्रक अभियोग्यता चाचणी (CAT) चे घटक दर्शवणाऱ्या मतावलीचे विश्लेषण**

| अ.क्र | निकषांची यादी (List of points) | एकूण प्रतिसादक | सहमत (Agree) | % | असहमत (Disagree) | % |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | संमंत्रकाची बुद्धिमत्ता(**Intelligence of Counsellor)** | **20** | **18** | **90** | **02** | **10** |
| 2 | संमंत्रकाचे सामान्य ज्ञान **(General Knowledge of counsellor)** | **20** | **14** | **70** | **06** | **30** |
| 3 | मुक्त आणि दूरशिक्षण पद्धती **(Open and Distance Learning System)** | **20** | **19** | **95** | **01** | **05** |
| 4 | संमंत्रकाद्वारा मूल्यमापन क्षमता **(Evaluation ability of counsellor)** | **20** | **02** | **10** | **18** | **90** |
| 5 | संमंत्रकाचा तात्विक, समाजशास्त्रीय, मानसशास्त्रीय दृष्टीकोन **(Philosophical, Sociological and Psychological point of view of counsellor)** | **20** | **15** | **75** | **05** | **25** |
| 6 | संमंत्रकाचा व्यक्तिमत्व विकास **(Personality Development of counsellor)** | **20** | **12** | **60** | **08** | **40** |
| 7 | संमंत्रकाचे शैक्षणिक सामान्य ज्ञान **(Counsellors Educational General Knowledge)** | **20** | **9** | **45** | **11** | **55** |
| 8 | विद्यार्थी सहाय्य प्रक्रियेतील सहभाग **(Active participation in Student Support System)** | **20** | **19** | **95** | **01** | **05** |
| 9 | संमंत्रकाची संमंत्रण (अध्ययन, अध्यापन, मूल्यमापन) प्रक्रिया **(Counsellors Counselling** | **20** | **18** | **90** | **02** | **10** |

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7, **May**-2020

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | **(Learning, Teaching, Evaluation) System)** | | | | | |
| **10** | संमंत्रकाचे कार्य व जबाबदारी **(Roll and Responsibility of Counsellor)** | **20** | **18** | **18** | **02** | **10** |
| **11** | संमंत्रकाचे संशोधन ज्ञान व क्षमता **(Counsellors Research Knowledge and Ability)** | **20** | **15** | **75** | **05** | **25** |
| **12** | संमंत्रक व अध्ययनार्थी याच्यातील आंतर्क्रिया **(Relationship of Counsellor and Student)** | **20** | **18** | **90** | **02** | **10** |
| **13** | संमंत्रकाचे माहिती तंतरज्ञान, संप्रेषण व कौशल्य क्षमता **(Counsellors Ability of Information communication, Technology and skill)** | **20** | **19** | **95** | **01** | **05** |
| **14** | संमंत्रकाचा संमंत्रणाविषयीचा उद्देश **(Counsellors main purpose of counselling)** | **20** | **13** | **65** | **07** | **35** |
| **15** | संमंत्रकाची भाषिक क्षमता **(Counsellors language ability)** | **20** | **11** | **55** | **09** | **45** |
| **16** | संमंत्रकाचे आशय ज्ञान **(Counsellors Content Knowledge)** | **20** | **14** | **70** | **06** | **30** |
| **17** | संमंत्रकाचे शैक्षणिक विस्तार कार्य **(Counsellors Educational Extension Work)** | **20** | **16** | **80** | **04** | **20** |
| **18** | संमंत्रकाचे सामाजिक विस्तार कार्य **(Counsellors Social Extension Work)** | **20** | **08** | **40** | **12** | **60** |
| **19** | संमंत्रकाची व्यवसायिक निष्ठा क्षमता **(Counsellors Professional Development)** | **20** | **14** | **70** | **06** | **30** |
| **20** | संमंत्रकाची आकलन क्षमता **(Counsellors Understanding Ability)** | **20** | **07** | **35** | **13** | **65** |

वरील कोष्टकानुसार प्राप्त माहितीच्या विश्लेषणाच्या आधारे तज्ज्ञांनी भरून दिलेल्या मतावलीच्या आधारे काही निष्कर्ष अर्थनिर्वचनासहित मांडण्यात आली ती पुढीलप्रमाणे.

Copyright©authors

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7, May-2020

**1.अर्थनिर्वचन:-** प्राप्त माहितीच्या विश्लेषनावरून असे लक्षात येते की 20 तज्ज्ञांनी दिलेल्या एकूण प्रतीसादापैकी 90% तज्ज्ञ या घटकाशी सहमती दर्शवतात तर 10% तज्ञांच्या मतानुसार संमंत्रकाची बुध्दिमत्ता तपासणे महत्वाचे आहे. असहमत तज्ञापेक्षा सहमत तज्ज्ञ हे जवळपास 18 मताने अधिक आहे म्हणून प्राप्त झालेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे.

**निष्कर्ष:-** संमंत्रकाची बुद्धिमत्ता हा घटक महत्वाचा असल्याने त्याचा मुख्य घटक म्हणून स्वीकार आहे.

**2.अर्थनिर्वचन:-** प्राप्त माहितीच्या विश्लेषनावरून असे लक्षात येते की 20 तज्ज्ञांनी दिलेल्या एकूण प्रतीसादापैकी 70% तज्ज्ञ या घटकाशी सहमती दर्शवतात तर 30% तज्ज्ञ या घटकाशी असहमत आहे. असहमत तज्ञापेक्षा सहमत तज्ज्ञ हे जवळपास 14 मताने अधिक आहे म्हणून प्राप्त झालेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे.

**निष्कर्ष:-** संमंत्रकाचे सामान्यज्ञान हा घटक उपघटक म्हणून स्वीकार आहे.

**3. अर्थनिर्वचन:-** प्राप्त माहितीच्या विश्लेषनावरून असे लक्षात येते की 20 तज्ज्ञांनी दिलेल्या एकूण प्रतीसादापैकी 95% तज्ज्ञ या घटकाशी सहमती दर्शवतात तर 05% तज्ज्ञ या घटकाशी असहमत आहे. असहमत तज्ञापेक्षा सहमत तज्ज्ञ हे जवळपास 15 ने अधिक आहे म्हणून प्राप्त झालेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे.

**निष्कर्ष:-** मुक्त आणि दूरशिक्षण पद्धती हा घटक महत्वाचा असल्याने त्याचा मुख्य घटक म्हणून स्वीकार आहे.

**4. अर्थनिर्वचन:-** प्राप्त माहितीच्या विश्लेषनावरून असे लक्षात येते की 20 तज्ज्ञांनी दिलेल्या एकूण प्रतीसादापैकी 10% तज्ज्ञ या घटकाशी सहमती दर्शवतात तर 90% तज्ज्ञ या घटकाशी असहमत आहे. असहमत तज्ञापेक्षा सहमत तज्ज्ञ हे जवळपास 18 ने कमी आहे म्हणून प्राप्त झालेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे.

**निष्कर्ष:-** संमंत्रकाची मूल्यमापन क्षमता हा घटक अध्ययन ,अध्यापन आणि मूल्यमापनामध्ये समाविष्ट करावा स्वतंत्र घटक नसावा.

**5. अर्थनिर्वचन:-** प्राप्त माहितीच्या विश्लेषनावरून असे लक्षात येते की 20 तज्ज्ञांनी दिलेल्या एकूण प्रतीसादापैकी 75% तज्ज्ञ या घटकाशी सहमती दर्शवतात तर 25% तज्ज्ञ या घटकाशी असहमत आहे. असहमत तज्ञापेक्षा सहमत तज्ज्ञ हे जवळपास 15 ने अधिक आहे म्हणून प्राप्त झालेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे.

**निष्कर्ष:-** संमंत्रकाचा तात्विक, मानसशास्त्रीय,समाजशास्त्रीय दृष्टीकोन हा घटक महत्वाचा आहे.

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7, May-2020

**6. अर्थनिर्वचन:-** प्राप्त माहितीच्या विश्लेषनावरून असे लक्षात येते की 20 तज्ज्ञांनी दिलेल्या एकूण प्रतीसादापैकी 60% तज्ज्ञ या घटकाशी सहमती दर्शवतात तर 40% तज्ज्ञ या घटकाशी असहमत आहे. असहमत तज्ञापेक्षा सहमत तज्ज्ञ हे जवळपास 12 ने अधिक आहे म्हणून प्राप्त झालेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे.

**निष्कर्ष:-** संमंत्रकाची क्तिमत्व विकास हा घटक महत्वाचा आहे परंतु हा घटक स्वतंत्र न ठेवता संमंत्रकाची गुणवत्ता या घटकात समाविष्ट करावा.

**7. अर्थनिर्वचन:-** प्राप्त माहितीच्या विश्लेषनावरून असे लक्षात येते की 20 तज्ज्ञांनी दिलेल्या एकूण प्रतीसादापैकी 45% तज्ज्ञ या घटकाशी सहमती दर्शवतात तर 55% तज्ज्ञ या घटकाशी असहमत आहे. असहमत तज्ञापेक्षा सहमत तज्ज्ञ हे जवळपास 09 ने कमी आहे म्हणून प्राप्त झालेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे.

**निष्कर्ष:-** संमंत्रकाची शैक्षणिक सामान्य ज्ञान हा घटक फारसा महत्वाचा आहे.

**8. अर्थनिर्वचन:-** प्राप्त माहितीच्या विश्लेषनावरून असे लक्षात येते की 20 तज्ज्ञांनी दिलेल्या एकूण प्रतीसादापैकी 95% तज्ज्ञ या घटकाशी सहमती दर्शवतात तर 05% तज्ज्ञ या घटकाशी असहमत आहे. असहमत तज्ञापेक्षा सहमत तज्ज्ञ हे जवळपास 18 ने अधिक आहे म्हणून प्राप्त झालेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे.

**निष्कर्ष:-** संमंत्रकाचा विद्यार्थी सहाय्य प्रक्रियेतील सहभाग हा घटक महत्वाचा असल्याने त्याचा मुख्य घटक म्हणून स्वीकार आहे.

**9. अर्थनिर्वचन:-** प्राप्त माहितीच्या विश्लेषनावरून असे लक्षात येते की 20 तज्ज्ञांनी दिलेल्या एकूण प्रतीसादापैकी 90% तज्ज्ञ या घटकाशी सहमती दर्शवतात तर 10% तज्ज्ञ या घटकाशी असहमत आहे. असहमत तज्ञापेक्षा सहमत तज्ज्ञ हे जवळपास 18 ने अधिक आहे म्हणून प्राप्त झालेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे.

**निष्कर्ष:-** संमंत्रकाची संमंत्रण प्रक्रिया (अध्ययन, अध्यापन, मूल्यमापन) हा घटक महत्वाचा आहे.

10. **अर्थनिर्वचन:-** प्राप्त माहितीच्या विश्लेषनावरून असे लक्षात येते की 20 तज्ज्ञांनी दिलेल्या एकूण प्रतीसादापैकी 90% तज्ज्ञ या घटकाशी सहमती दर्शवतात तर 10% तज्ज्ञ या घटकाशी असहमत आहे. असहमत तज्ञापेक्षा सहमत तज्ज्ञ हे जवळपास 18 ने अधिक आहे म्हणून प्राप्त झालेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे.

**निष्कर्ष:-** संमंत्रकाचे कार्य व जबाबदारी हा घटक महत्वाचा आहे.

11. **अर्थनिर्वचन:-** प्राप्त माहितीच्या विश्लेषनावरून असे लक्षात येते की 20 तज्ज्ञांनी दिलेल्या एकूण प्रतीसादापैकी 75% तज्ज्ञ या घटकाशी सहमती दर्शवतात तर 25% तज्ज्ञ या

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7, May-2020

घटकाशी असहमत आहे. असहमत तज्ञापेक्षा सहमत तज्ज्ञ हे जवळपास 15 ने अधिक आहे म्हणून प्राप्त झालेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे.

**निष्कर्ष:-** संमंत्रकाची संशोधन ज्ञान व क्षमता हा घटक महत्वाचा आहे.

12. **अर्थनिर्वचन:-** प्राप्त माहितीच्या विश्लेषनावरून असे लक्षात येते की 20 तज्ज्ञांनी दिलेल्या एकूण प्रतीसादापैकी 90% तज्ज्ञ या घटकाशी सहमती दर्शवतात तर 10% तज्ज्ञ या घटकाशी असहमत आहे. असहमत तज्ञापेक्षा सहमत तज्ज्ञ हे जवळपास 18ने अधिक आहे म्हणून प्राप्त झालेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे.

**निष्कर्ष:-** संमंत्रक व अध्ययनार्थी यांच्यातील आंतर्क्रिया हा घटक महत्वाचा आहे.

13. **अर्थनिर्वचन:-** प्राप्त माहितीच्या विश्लेषनावरून असे लक्षात येते की 20 तज्ज्ञांनी दिलेल्या एकूण प्रतीसादापैकी 95% तज्ज्ञ या घटकाशी सहमती दर्शवतात तर 05% तज्ज्ञ या घटकाशी असहमत आहे. असहमत तज्ञापेक्षा सहमत तज्ज्ञ हे जवळपास 19 ने अधिक आहे म्हणून प्राप्त झालेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे.

**निष्कर्ष:-** संमंत्रकाचे माहिती तंत्रज्ञान ,संप्रेषण व कौशल्य क्षमता हा घटक महत्वाचा आहे.

14. **अर्थनिर्वचन:-** प्राप्त माहितीच्या विश्लेषनावरून असे लक्षात येते की 20 तज्ज्ञांनी दिलेल्या एकूण प्रतीसादापैकी 65% तज्ज्ञ या घटकाशी सहमती दर्शवतात तर ३५ % तज्ज्ञ या घटकाशी असहमत आहे. असहमत तज्ञापेक्षा सहमत तज्ज्ञ हे जवळपास 13 ने अधिक आहे म्हणून प्राप्त झालेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे.

**निष्कर्ष:-** संमंत्रकाचा संमंत्रणाविषयीचा उद्देश हा घटक महत्वाचा आहे.

15. **अर्थनिर्वचन:-** प्राप्त माहितीच्या विश्लेषनावरून असे लक्षात येते की 20 तज्ज्ञांनी दिलेल्या एकूण प्रतीसादापैकी 55% तज्ज्ञ या घटकाशी सहमती दर्शवतात तर 45% तज्ज्ञ या घटकाशी असहमत आहे. असहमत तज्ञापेक्षा सहमत तज्ज्ञ हे जवळपास 11 ने अधिक आहे म्हणून प्राप्त झालेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे.

**निष्कर्ष:-** संमंत्रकाची भाषिक क्षमता हा घटक महत्वाचा आहे.

16. **अर्थनिर्वचन:-** प्राप्त माहितीच्या विश्लेषनावरून असे लक्षात येते की 20 तज्ज्ञांनी दिलेल्या एकूण प्रतीसादापैकी 70% तज्ज्ञ या घटकाशी सहमती दर्शवतात तर ३ 0% तज्ज्ञ या घटकाशी असहमत आहे. असहमत तज्ञापेक्षा सहमत तज्ज्ञ हे जवळपास 14 ने अधिक आहे म्हणून प्राप्त झालेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे.

**निष्कर्ष:-** संमंत्रकाचे आशय ज्ञान हा घटक महत्वाचा आहे.

17. **अर्थनिर्वचन:-** प्राप्त माहितीच्या विश्लेषनावरून असे लक्षात येते की 20 तज्ज्ञांनी दिलेल्या एकूण प्रतीसादापैकी 80% तज्ज्ञ या घटकाशी सहमती दर्शवतात तर 20% तज्ज्ञ या

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7, May-2020

घटकाशी असहमत आहे. असहमत तज्ञापेक्षा सहमत तज्ज्ञ हे जवळपास 16 ने अधिक आहे म्हणून प्राप्त झालेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे.

**निष्कर्ष:-** संमंत्रकाचे शैक्षणिक विस्तार कार्य हा घटक महत्वाचा आहे.

18. **अर्थनिर्वचन:-** प्राप्त माहितीच्या विश्लेषनावरून असे लक्षात येते की 20 तज्ज्ञांनी दिलेल्या एकूण प्रतीसादापैकी 40% तज्ज्ञ या घटकाशी सहमती दर्शवतात तर 60% तज्ज्ञ या घटकाशी असहमत आहे. असहमत तज्ञापेक्षा सहमत तज्ज्ञ हे जवळपास 12 ने कमी आहे म्हणून प्राप्त झालेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे.

**निष्कर्ष:-** संमंत्रकाचे सामाजिक विस्तार कार्य हा घटक फारसा महत्वाचा आहे.

19. **अर्थनिर्वचन:-** प्राप्त माहितीच्या विश्लेषनावरून असे लक्षात येते की 20 तज्ज्ञांनी दिलेल्या एकूण प्रतीसादापैकी 70% तज्ज्ञ या घटकाशी सहमती दर्शवतात तर 30% तज्ज्ञ या घटकाशी असहमत आहे. असहमत तज्ञापेक्षा सहमत तज्ज्ञ हे जवळपास 14 ने अधिक आहे म्हणून प्राप्त झालेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे.

**निष्कर्ष:-** संमंत्रकाची व्यावसायिक निष्ठा हा घटक महत्वाचा असल्याने त्याचा मुख्य घटक म्हणून स्वीकार करावा.

20. **अर्थनिर्वचन:-** प्राप्त माहितीच्या विश्लेषनावरून असे लक्षात येते की 20 तज्ज्ञांनी दिलेल्या एकूण प्रतीसादापैकी 65% तज्ज्ञ या घटकाशी सहमती दर्शवतात तर 35% तज्ज्ञ या घटकाशी असहमत आहे. असहमत तज्ञापेक्षा सहमत तज्ज्ञ हे जवळपास 13 ने कमी आहे म्हणून प्राप्त झालेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे.

**निष्कर्ष:-** संमंत्रकाची आकलन क्षमता हा घटक चाचणी विकसनामध्ये समाविष्ट असावा.

वरील माहितीच्या विश्लेश्नानुसार आणि तज्ज्ञ व्यक्तीची प्रत्यक्ष भेट घेवून संबंधीत विषयावर चर्चा करून मतावली भरून देतांना तज्ज्ञांनी काही मार्गदर्शक सूचना केल्या. ज्या संमंत्रक अभियोग्यतेच्या निकषांची निश्चिती करण्यासाठी महत्वाच्या होत्या. त्यासूचना पुढील प्रमाणे मांडण्यात आलेल्या आहेत.

1) मुक्त आणि दूर शिक्षण पद्धती मध्ये संमंत्रणाचे कार्य करणाऱ्या संमंत्रकाची शैक्षणिकअर्हता ही उच्चदर्जाची असणे गरजेचे आहे.
2) संमंत्रक निवडतांनात्यांच्या अध्यापनाचा अनुभव अत्युच्च असावा.
3) घटक क्रमांक 1, 2, 15 हे प्राथमिक स्वरूपाचे परंतु महत्वाचे असल्यामुळे त्याचा एकच गट करावा.
4) घटक क्रमांक.18 संमंत्रकाचे सामाजिक विस्तार कार्य हा घटक पूर्णपणे संमंत्रकाच्या व्यक्तिगत जीवनाशी निगडीत असल्यामुळे या घटकाचा संमंत्रक अभियोग्यता चाचणी मध्ये विचार करू नये.

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7, **May**-2020

5) संमंत्रक अभियोग्यता चाचणी मध्ये मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून विद्यार्थ्यांशी भावनिक समायोजन बाबतचे काहीप्रश्न असावेत. तसेच प्रेरणा देणारे कौशल्याचा समावेश असावा.
6) समस्या निराकरण, संमंत्रकाचे ताणतणावाचे व्यवस्थापन याचा विचार अभियोग्यता चाचणी मध्ये करण्यात यावा.
7) अध्यानार्थीबद्दल आदर, आस्थाव आपलेपणाची भावना वृद्धीसाठीचे कौशल्ये अधिक स्पष्टपणे चाचणी मध्येसमावेश करावा.
8) करीयर मार्गदर्शनासंदर्भातील प्रश्नाचा संमंत्रक अभियोग्यता चाचणी मध्ये समावेश करावा.
9) एकूण 20 मुद्द्यांमध्ये काही मुद्द्ये एकमेकांशी संलग्न असल्यामुळे त्या मुद्द्याचे एकत्रीकरणकरावे.
10) संमंत्रकाची विद्यार्थी सहाय्य प्रक्रियेतील सहभाग ही अतिशय महत्वाची संकल्पना असल्यामुळे या मुद्द्याचा स्वतंत्रसंच करावा.
11) संमंत्रकाचे संभाषण कौशल्य आणि संमंत्रक व अध्यानार्थी याच्यातील आंतर्क्रिया हे दोन्ही घटक एकमेकांशी संबंधीत असल्यामुळे त्यांचा एका संचामध्ये समावेश करावा तसेच उपयोजनात्मक प्रश्न काढावे.
12) संमंत्रकाचे विद्यापीठातील कार्य, दूर शिक्षणाप्रती असलेली भूमिका, प्रशासकीय कामे, संमंत्रणाविषयी असलेली स्वंय –प्रेरणाया विषयीचे अधिक स्पष्टीकरण करावे तसेच यावर आधारित जास्तीत जास्त प्रश्नांचा संमंत्रक अभियोग्यता चाचणी मध्ये समावेश करावा

वरील निष्कर्षच्या आधारे संमंत्रक अभियोग्यता चाचणी विकसन प्रक्रियेसाठी घेण्यात आलेल्या तज्ञांच्या मतावलीच्या आधारे, वरील सर्व मुद्द्यांना प्राधान्यक्रम देण्यात आला तसेच काही घटक हे एकमेकांना समान असल्यामुळे त्यांचे संमंत्रक अभियोग्यता चाचणी चे निकष ठरवण्यासाठी वर्गीकरण करण्यात आले ते पुढीलप्रमाणे -

**कोष्टक क्र.3 संमंत्रक अभियोग्यता चाचणी विकसनातील निकष**

| अ.क्र. | मुख्य घटक | उपघटक |
|---|---|---|
| 1 | संमंत्रकाची बौद्धिक योग्यता | 1.संमंत्रकाचे सामान्य ज्ञान<br>2.संमंत्रकाची बुद्धिमत्ता<br>3.संमंत्रकाची संभाषण /संप्रेषण क्षमता |
| 2 | संमंत्रक आणि विद्यार्थी सहाय्य | 1.संमंत्रकाचे कार्य व जबावदारी<br>2.विद्यार्थी सहाय्य प्रक्रियेतील सहभाग<br>3.संमंत्रक व अध्ययनार्थी यांच्यातील आंतर्क्रिया<br>4.करीयर मार्गदर्शनामध्ये संमंत्रकाचा सहभाग |

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7, May-2020

| | | |
|---|---|---|
| 3 | संमंत्रकाचे मुक्त आणि दूर शिक्षणपद्धतीचे आकलन | 1.संमंत्रकाचा तात्विक, मानसशास्त्रीय, समाजशास्त्रीय दृष्टीकोन<br>2.संमंत्रकाचे आशयज्ञान<br>3. मुक्त आणि दूर शिक्षण पद्धती<br>4.संमंत्रकाचा संमंत्रणा विषयीचा उद्देश आणि जाणीव |
| 4 | संमंत्रकाचे संमंत्रण सत्र | 1.अध्ययन ,अध्यापन व मूल्यमापन प्रक्रिया<br>2. ICT बाबतचे उपयोजन<br>3. संमंत्रकाचे अध्यापनशास्त्रीय ज्ञान<br>4.संमंत्रण कार्य पद्धती विषयीची माहिती व उपयोजन |
| 5 | संमंत्रकाची व्यावसायिकता | 1.शैक्षणिक विस्तार कार्य<br>2.व्यावसायिक निष्ठा<br>3.संशोधक वृत्ती<br>4. संमंत्रकाची गुणवत्ता |

**समारोप:-**

प्रस्तुत अभ्यासाच्या निष्कर्षांवरून असे लक्षात येते की, संमंत्रक अभियोग्यता चाचणी विकसन करतांना एकूण पाच निकष निश्चित करण्यात आले पुढीलप्रमाणे- 1.संमंत्रकाची बौद्धिक योग्यता, 2. संमंत्रक आणि विद्यार्थी सहाय्य, 3. संमंत्रकाचे मुक्त आणि दूर शिक्षणपद्धतीचे आकलन, 4.संमंत्रकाचे संमंत्रण सत्र, 5. संमंत्रकाची व्यावसायिकता अशा महत्वाच्या पाच निकषांची निश्चिती संमंत्रक अभियोग्यता चाचणी चे विकसन करण्यासाठी करण्यात आली.

**संदर्भग्रंथ सूची:**

1. उपासनी ,ना.के.,कुलकर्णी के,वि.(१९८७), नवे शैक्षणिक मूल्यमापन आणि संख्याशास्त्र: पुणे, श्रीविद्या प्रकाशन.
2. घोरमोडे, के,यु.,घोरमोडे,क. (२०१०), शैक्षणिकमार्गदर्शन आणि समुपदेशन: नागपूर,विद्या प्रकाशन.
3. चौधरी, बा. आ., कदम,चा. प.( २००४),शैक्षणिक मूल्यमापन: पुणे, नित्यनूतन प्रकाशन.
4. जोशी, शोभना., शेटकर, ग. (२००४) शैक्षणिक व मानसिक मापन: औरंगाबाद, विश्व प्रकाशन.
5. जोशी, शोभना., शेटकर, ग. (२००६) शैक्षणिक मूल्यमापन: औरंगाबाद, विश्व प्रकाशन.
6. दांडेकर, वा. ना. (१९९८) शैक्षणिक मूल्यमापन: नागपूर, श्रीविद्या प्रकाशन.
7. दुनाखे,अ. (२००४) शैक्षणिकव व्यावसायिक मार्गदर्शन आणि समुपदेशन: पुणे, नित्यनूतन प्रकाशन.

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7, **May**-2020

8. पंडित, ब.बी.(२०१०) शिक्षणातील संशोधन: पुणे, नित्यनूतन प्रकाशन.
9. पंडित, ब.बी. (२००९) शिक्षणातील संशोधन अभिकल्प: पुणे, नित्यनूतन प्रकाशन.
10. पाटील,अ. (२००८) मानसशास्त्रीयचाचण्या: पुणे,डायमंड पब्लिकेशन.
11. बोरुडे, रा.र. (२०१०) संशोधन पद्धतीशास्त्र: पुणे, पुणेविद्यार्थीगृह प्रकाशन.
12. भिंताडे, वि. रा. (१९९९) शैक्षणिकसंख्याशास्त्र: पुणे, नित्यनूतन प्रकाशन.
13. मुळे, रा. सं., उमाठे,वि. स.(१९८७) शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे: नागपूर, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ.
14. पाईकराव, साळुंके,राजदेरकर. (२००८) समंत्रंण: तंत्र व मंत्र: नाशिक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, ग्रंथनिर्मिती केंद्र यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.
15. Best J.W., A (1989), Research in Education, New Delhi, Prentice Hall.